MHTH170036182026

स. फौ. ख. क्र. २६९७/२०२६
नि. क्र. ०२

न्यायालय विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, पालघर.

अपराधाची तारीखः – ०९.०६.२०२६

फिर्याद दिल्याची तारीखः – ०९.०६.२०२६

फिर्यादीचे नाव, वय व पत्ताः – सरकारतर्फे पोलीस ठाणे, अधिकारी,
जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा, पालघर,
ता. जि. पालघर.

आरोपीचे नाव, वय व पत्ताः – किशोर मधुकर भुतखडे,
वय – निरंक वर्षे,
रा.– माहिम केळवा, ता. जि. पालघर.

**अपराधाचे विवरणः** –

दिनांक ०९.०६.२०२६ रोजी २१.५५ वाजता चाररस्ता, पालघर, ता. जि. पालघर येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन नोंदणी क्रमांक एमएच ४८ डीयू १६८६ हे वाहन तुम्ही तुमच्या प्रति १०० मि.ली. रक्तामध्ये ३० एम.जी पेक्षा जास्त अल्कोहलचे प्रमाण असताना चालविताना मिळून आले व त्याद्वारे मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८५ नुसार गुन्हा केला.

SUJATA RAKESH BANDAL
Digitally signed by SUJATA RAKESH BANDAL
Date: 2026.08.03 17:14:57 +0530

(सुजाता रा. बांदल)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पालघर.

दिनांकः ०३.०८.२०२६
ठिकाणः पालघर.

**आरोपीचे प्रतिकथन**

प्रश्न क्र. १ – तुम्हाला दोषारोपपत्राच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर – होय.

प्रश्न क्र. २ – तुमच्यावर लावण्यात आलेला आरोप वाचुन दाखविला तो तुम्हाला समजला काय ?
उत्तर – होय.

प्रश्न क्र. ३ – तुम्हाला शासनाकडुन सरकारी वकील पाहीजे काय ?
उत्तर – नाही.

प्रश्न क्र. ४ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर – होय.

..............................
आरोपीची सही/आंगठा

SUJATA RAKESH BANDAL Digitally signed by SUJATA RAKESH BANDAL Date: 2026.08.03 17:15:03 +0530

(सुजाता रा. बांदल)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पालघर.

दिनांकः ०३.०८.२०२६
ठिकाणः पालघर.

## न्यायनिर्णय

आरोपीने प्रत्यक्ष हजर राहुन स्वेच्छेने गुन्हा कबुल केला आहे. त्याला कबुलीच्या परिणामाची माहीती देण्यात आली. तो स्वइच्छेने दोष कबुल करतो. आरोपी हा कुठल्याही दबावाशिवाय आणि स्वतःच्या मर्जीने गुन्हा कबुल करीत आहे याची खात्री करण्यात आली. आरोपी हा चालक असून त्यास प्रतिदीन रुपये ५००/– उत्पन्न मिळते. त्याच्यावर त्याचे कुटूंब अवलंबुन आहे. आरोपीचा हा पहिला गुन्हा असुन त्यांची गुन्हेगारी पाशर्वभुमी नाही. आरोपीचे सदर कथन आणि गुन्हा कबुल करण्यात दाखविलेला प्रांजळपणा लक्षात घेता पुढील आदेश न्यायोचित ठरेल, असे ठाम मत झाल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## आदेश

१. आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ नूसार मोटार वाहन कायदा कलम १८५ खालील गुन्हासाठी दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीला मोटार वाहन कायदा कलम १८५ या गुन्हयाकरीता रुपये १०,०००/– (अक्षरी दहा हजार फक्त) द्रव्यदंड ठोठावण्यात येते. द्रव्यदंड न भरल्यास त्यास १५ दिवस साधी कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

SUJATA RAKESH BANDAL Digitally signed by SUJATA RAKESH BANDAL Date: 2026.08.03 17:15:09 +0530

(सुजाता रा. बांदल)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पालघर.

दिनांकः ०३.०८.२०२६
ठिकाणः पालघर.